RNI No. MAHBIL /2009/37831

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष १२, अंक ३८] मंगळवार, मार्च १७, २०२६/फाल्गुन २६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक ११८

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय,

मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ मार्च २०२६.

अधिसूचना

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.

क्रमांक आयडीसी २०२४/(प्र.क्र.१६१)/उद्योग १४ .—ज्याअर्थी, अनुसूचित उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा. तीन) चे प्रकरण सहा, जे अधिसूचना क्रमांक आयडीसी २००६/(७९७)/उद्योग १४, दिनांक १० जुलै २००७ अन्वये महाराष्ट्र शासनाने सदर अधिसूचनेच्या अनुसूचीत उल्लेखिलेल्या क्षेत्रात महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम तीन) चे कलम सहा, दिनांक ११ जुलै २००७ रोजी अंमलात आणले होते तसेच सदर प्रकरण ६ च्या अधिसूचनेस क्र. आयडीसी २००८/(५५६)/उद्योग १४, दिनांक २२ सप्टेंबर २००८ अन्वये उक्त अनुसूचीत नमूद केलेले क्षेत्राकरीता शुद्धीपत्रक निर्गमित करण्यात आले आहे व उक्त अधिनियमाच्या आधारे मौजे कौडगाव, तालुका उस्मानाबाद, जिल्हा उस्मानाबाद येथील उक्त अनुसूचीत नमूद केलेले क्षेत्र अधिनियमाच्या कलम २, खंड (ग) अन्वये औद्योगिक क्षेत्र म्हणून जाहीर केलेले आहे ;

आणि ज्याअर्थी, उप विभागीय अधिकारी व भूसंपादन अधिकारी उस्मानाबाद, उस्मानाबाद विभाग, जिल्हा उस्मानाबाद यांनी उक्त अधिनियमातील कलम ३२ च्या पोट-कलम (१) नुसार, भाग एक औरंगाबाद विभागीय पुरवणी, पृष्ठ क्र.१०३२ वर दिनांक १५ मे २००८ च्या **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात** नोटीस क्रमांक २००७/एलएनक्यू-सीआर-१ दिनांक १३ मे २००८ रोजी प्रसिद्ध करुन, उक्त औद्योगिक क्षेत्रासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरु केली आहे आणि उक्त कलम ३२ च्या पोट-कलम (४) नुसार उक्त नोटीसेत नमूद केलेले क्षेत्र सर्वभार मुक्त होवून राज्य शासनाच्या ठायी निहीत झाले आहे.

आणि ज्याअर्थी, या सोबत जोडलेल्या अनुसूचीतील जमिनीचा (यापुढे जिचा उल्लेख उक्त जमीन असा करण्यात येईल) ताबा राज्य शासन किंवा त्याच्या वतीने घेण्यात आलेला नाही आणि उक्त जमीन उक्त कायद्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक नाही असे राज्य शासनाचे मत झाले आहे.

त्याअर्थी आता, उक्त अधिनियमाच्या कलम ३२ च्या पोट-कलम (४) मधील परंतुक व इतर अधिकारांचा वापर करून राज्य शासन उक्त जमीन संपादनातून काढून घेत आहे आणि असे घोषित करीत आहे की, ही सूचना **महाराष्ट्र शासन राजपत्रात** प्रसिद्ध झाल्यानंतर कलम ३२ च्या पोट-कलम (१) नुसार नोटिस प्रसिद्ध होण्याच्या लगतपूर्वी उक्त जमीन जिच्याकडे निहीत होती त्या व्यक्तिकडे ती त्यावेळी अस्त्विात असतील असे भारांना अधिन राहून पूर्वलक्षी प्रभावासह पुनर्निहित होईल.

अनुसूची

मौजे कौडगाव, तालुका धाराशिव, जिल्हा धाराशिव.

अ. क्र.	**सर्व्हे नंबर**	**क्षेत्र हे.आर.**
१	२०३ पैकी	०.६०
२	२०४ पैकी	४.२६
३	२०७	१.७८
	एकूण	**६.६४**

चतुःसिमा :

उत्तरेस : मौजे कौडगाव येथील गट नं. २०६

दक्षिणेस : मौजे कौडगाव येथील गट नं. २०० व २०२

पुर्वेस : मौजे कौडगाव गट नं.२०२ पैकी व मौजे कौडगाव तांडाकडे जाणारा रस्ता.

पश्चिमेस : मौजे कौडगाव गट नं.२०५ पैकी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. श्रीकांत पुलकुंडवार,
शासनाचे सह सचिव.

INDUSTRIES, ENERGY, LABOUR AND MINING DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,

Mumbai 400 032, dated 17th March, 2026.

NOTIFICATION

MAHARASHTRA INDUSTRIAL DEVELOPMENT ACT, 1961.

No. IDC 2024/(C.R.161)/IND 14.—Whereas, by Government Notification, Industries, Energy and Labour Department, No.IDC.2006/(797)/IND-14, dated the 10th July 2007 issued under sub-section (*3*) of section 1 of the Maharashtra Industrial Development Act, 1961 (Mah.III of 1962) (hereinafter referred to as "the said Act "), the Government of Maharashtra has appointed the 11th July 2007, also Corrigendum has been issued as per notification No. IDC 2008 / (556) / IND 14, dated 22nd September 2008 for the area mentioned in the said schedule to be the date from which the provisions of Chapter VI of the said Act shall take effect in certain areas in village Kaudgaon, Taluka Osmanabad, District Osmanabad mentioned in the Schedule appended to the said notification and declared the said area as an industrial area under clause (*g*) of section 2 of the said Act ;

And whereas, Sub Divisional Officer and Land Acquisition Officer, Osmanabad, Osmanabad Division, District Osmanabad has by issuing notice No.2007-LNQ-CR-1 dated 13th May 2008 published in the *Maharashtra Government Gazette*, Part I Supplementary, Aurangabad Divisional Supplement, Ordinary 15th May 2008, on pages No. 1032, under sub-section (*1*) of section 32 of the said Act , acquired the lands in the said industrial area, and as such, the lands mentioned in the said notice have vested absolutely in the State Government free from all encumbrances under sub-section (*4*) of said section 32 ;

And whereas, the actual possession of the lands mentioned in the Schedule appended hereto (thereinafter referred to as " the said lands") was not taken by or on behalf of the State Government and it appears to the State Government that the said lands is no more required for the purpose of the said Act.

Now, therefore in exercise of the powers conferred by the proviso to sub-section (*4*) of section 32 of the said Act and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra hereby withdraws the said land from acquisition and declares that, on the publication of this Notice in the *Maharashtra Government Gazette*, the said land shall re-vest with retrospective effect in the person in whom it was vesting immediately before the publication of the notice under sub-section (*1*) of said section 32, subject to such encumbrances, if any, as may be subsisting at that time.

Schedule

Village Kaudgaon, Taluka Dharashiv, District Dharashiv

Serial No.	Survey No.	Area H.R.
1	203 Pt.	0.60
2	204 Pt.	4.26
3	207	1.78
	Total	**6.64**

Boundaries :—

On the North by : Village Kaudgaon Gat No. 206

On the South by : Village Kaudgaon Gat No. 200 and 202

On the East by : Village Kaudgaon Gat No. 202 Pt. and Village Kaudgaon Tanda Road

On the West by : Village Kaudgaon Gat No. 205 Pt.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. SHRIKANT PULKUNDWAR,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.